## नियमित दिवाणी दावा क्र. १०७/२०१७ मधील
## नि.४३ वरील आदेश

(आदेश पारीत दिनांक १७/०७/२०२५)

१. प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ आदेश ६ नियम १७ प्रमाणे दाव्यात दुरुस्ती करण्याकरीता दाखल केलेला आहे.

२. वादीच्या कथनांप्रमाणे, प्रस्तुतचा दावा प्रतिवादीविरुध्द गांव मौजे चराठे येथील सर्वे नं.४३/१/१ आणि ४८अ/५ त्यालाच सि.स.नं.४७८६ या मिळकतीबाबत व त्यातील ९ मीटर रुंद आणि १०४ मीटर दावा रस्त्याबाबत कायम ताकीदीकरीता दाखल केलेला आहे. वादी यांनी प्रस्तुत दाव्यातील पान नं. ८, ९ वरील परिच्छेद क्र.५ नंतर ७, ८ आणि ७ असे परिच्छेद नंबर टंकलेखनीय चुकीमुळे नमूद केलेले असून त्याची दुरुस्ती पान नं. ८, ९ वरील परिच्छेद क्र. ५ नंतर ६, ७, ८ अशी करणेबाबत विनंती केलेली आहे.

३. वादी यांचे पुढे असे कथन आहे की, प्रतिवादी यांनी नि.२३ कडे आपली कैफियत दिलेली असून त्यामध्ये परिच्छेद क्र.१७ मधील पान क्र.५ वरील मजकुरानुसार दावा रस्त्याचे डांबरीकरण व खडीकरणाचे काम ठेकेदाराने पूर्ण केल्याचे विधान केलेले आहे. त्यामुळे वादी यांनी प्रस्तुत अर्जात नमुद परिच्छेद क्र.५अ हा मजकूर परिच्छेद क्र.५ नंतर व परिच्छेद क्र.८ मध्ये अर्जात नमुद 'भ' परिच्छेद नव्याने समाविष्ट करण्याची विनंती केलेली आहे. वादी मागत असलेली दुरुस्ती ही किरकोळ स्वरुपाची असल्याने दाव्याच्या मूळ स्वरुपात कोणताही बदल होणारा नाही तथा दाव्याच्या आकारात देखील बदल होणारा नाही. त्यामुळे वादी यांनी प्रस्तुत अर्जातील मजकूर दाव्यामध्ये समाविष्ट करुन तशी दुरुस्ती करणेची विनंती केलेली आहे.

३. प्रतिवादी यांनी प्रस्तुत अर्जावर आपले म्हणणे दाखल करुन अर्जास आक्षेप

नोंदविलेला आहे. त्यांचे असे कथन आहे की, अर्ज खोटा व खोडसाळ असून प्रतिवादी यांना मान्य नाही. वादीच्या मागणीप्रमाणे दुरुस्ती करण्यास परवानगी दिलेस दाव्याच्या स्वरुपात बदल होणारा आहे. दाव्यात नि.२३ कडे कैफियत दाखल झाल्यानंतर दि.१४/०२/२०१९ रोजी पासून दावा चौकशीस आहे. त्यानंतर दि.१५/०९/२०२२, १५/१२/२०२२, ०९/०२/२०२३ रोजी वादीस अंतीम संधी दिल्यानंतर दि.२७/०४/२०२३ रोजी वादी यांनी सरतपासाचे शपथपत्र दाखल केले. त्यानंतर दावा पुढील सरतपासाकरीता निश्चित करण्यात आला. एकंदर ही वस्तूस्थिती विचारात घेता दाव्याच्या कामकाजास विलंब होण्याच्या हेतूने वादीने प्रस्तुतचा अर्ज दिलेला आहे. सबब अर्ज नामंजूर करणेची त्यांनी विनंती केली.

४. अभिलेख, अर्ज व म्हणण्याचे अवलोकन केले.

५. दोन्ही बाजूंचा युक्तीवाद ऐकला.

६. वादीने प्रस्तुत अर्जातील दुरुस्ती ही किरकोळ स्वरुपाची असून प्रतिवादी यांनी आपल्या कैफियत मध्ये दावा रस्त्याचे डांबरीकरण व खडीकरण झाल्याचे कथन केलेले आहे, त्यामुळे प्रस्तावित दुरुस्तीची मागणी केलेली आहे. प्रतिवादींनी सदर दुरुस्तीकरीता आपली हरकत नोंदविलेली आहे. प्रस्तुत दाव्यामध्ये प्रतिवादी यांनी नि.२३ कडे कैफियत दाखल झाल्यानंतर दि.१४/०२/२०१९ रोजी पासून दावा चौकशी करीता प्रलंबित असताना वादीने प्रस्तुतचा अर्ज यापूर्वी दाखल न करण्याचे कोणतेही संयुक्तीक कारण दिलेले नाही. परंतु दावा मिळकतीबाबत झालेला बदल हा दावा दाखल झाल्यानंतरचा आहे. त्यामुळे त्याबाबतची दुरुस्ती अभिलेखावर झालेस दावा गुणदोषावर निर्णित होण्यास मदत होणार आहे. त्यामुळे दाव्याचे स्वरुप बदलत नाही. प्रतिवादी यांना सदर दुरुस्तीबाबत आपला पुरावा नोंदविण्याचे तसेच वादीतर्फे साक्षीदारांचा उलटतपास नोंदविण्याची संधी उपलब्ध असल्याने त्यांचे कोणतेही

नुकसान होताना दिसून येत नाही. परंतु प्रतिवादी यांनी आपली कैफियत सन २०१९ मध्ये अभिलेखावर दाखल केलेपासून वादींना प्रस्तावित दुरूस्ती करणेची पुरेपुर संधी उपलब्ध होती. त्यामुळे सदर दुरुस्ती ही यापूर्वी न करणेबाबत कोणतेही संयुक्तीक कारण वादीने अर्जामध्ये नमुद केलेले नाही. त्यामुळे प्रतिवादी यांची गैरसोय झालेली असून ती वादींवर योग्य तो खर्च आकारुन भरुन काढणे आवश्यक आहे. त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज हा खर्चासहीत मंजूर करणे योग्य व न्यायोचित होईल. सबब मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**-:: आदेश ::-**

१. वादीचा निशाणी क्र.४३ वरील अर्ज रक्कम रु.१,०००/-(रु.एक हजार मात्र) इतका खर्च आकारुन मंजूर करणेत येतो.

२. वादी यांनी खर्चाची रक्कम पुढील तारखेस वा तत्पूर्वी प्रतिवादी यांना देणेची आहे.

३. वादीने प्रस्तुत अर्जात नमूद केलेप्रमाणे दाव्यामध्ये दुरूस्ती करून दाव्याची दुरूस्त प्रत अभिलेखावर पुढील तारखेस वा तत्पूर्वी दाखल करावी.

(आदेश खुल्या न्यायदालनात जाहीर )

KUMBHAR RANJANA GOVIND
Digitally signed by KUMBHAR RANJANA GOVIND
Date: 2025.07.17 18:05:12 +0530

दिनांकः- १७/०७/२०२५ (श्रीमती आर.जी.कुंभार)
ठिकाणः- सावंतवाडी सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर),
सावंतवाडी.